केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी माता व नवजात अर्भकांना शासकीय रुग्णालयातून विनाशुल्क सेवा देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग,

शासन निर्णय, क्रमांक- जशिका २०११/प्र.क्र. ३५२/आरोग्य-३

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २६ सप्टेंबर, २०११.

वाचा : १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- जीरुफी १०००/प्र.क्र. ९०/आरोग्य ३, दिनांक १०.७.२००१.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- एमएजी २००४/प्र.क्र. २०/आरोग्य ३, दिनांक २१.७.२००४.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- जीरुफी २०००९/प्र.क्र. २३९/ आरोग्य-३, दिनांक २५.८.२००९.

४) आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांचे पत्र क्रमांक- राआसो/जशिसु/मोफत सेवा/१५३१८/११, दिनांक २८.७.२०११.

<u>प्रस्तावना</u> : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये शासकीय रुग्णालयातून देण्यात येणाऱ्या विविध रुग्णसेवेकरीता आकारण्यात येणारे शुल्क निश्चित केलेले आहे. या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या एकूण १४ संवर्गातील व्यक्ती आणि लाभधारकांना रुग्णसेवा शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. या १४ संवर्गांनंतर संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक-२ अन्वये "राज्यातील वरीष्ठ नागरिक" या संवर्गाचा अनुक्रमांक १५ येथे तर संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक-३ अन्वये "राज्यातील अधिस्विकृतीधारक पत्रकार" या संवर्गाचा अ.क्र. १६ येथे समावेश करण्यात आला आहे.

<u>शासन निर्णय :</u> केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे राज्यामध्ये "जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम" राबविण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक-१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ येथील संवर्गामध्ये अ.क्र.१७ येथे पुढील संवर्गाचा समावेश करण्यात येत आहे :-

**अ.क्र. १७ :- "गरोदर माता आणि ० ते ३० दिवस वयाची नवजात अर्भके" :-**

गरोदर मातांना नोंदणी ते बाळंतपण व त्यानंतर ६ आठवडे व नवजात अर्भकांना ० ते ३० दिवस पर्यंत नोंदणी शुल्क, विविध चाचण्या, उपचार, औषधे, आहार आणि घर ते रुग्णालय, रुग्णालय ते रुग्णालय व रुग्णालय ते घरी मोफत वाहतूक सेवा इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-६४८/११/व्यय १३, दिनांक २२.९.२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( सुहास रा. चव्हाण )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक.
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान संचालनालय, मुंबई.
सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा.
सर्व उप संचालक, आरोग्य सेवा.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
सर्व आरोग्य अधिकारी.
सर्व वैद्यकीय अधिक्षक/ वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालये.
वित्त विभाग (कार्यासन ), मंत्रालय, मुंबई.
सार्वजनिक आरोग्य विभाग (सर्व कार्यासने)
निवडनस्ती (आरोग्य ३).